**विशेष दिवाणी दावा क्र.३९/२०२३**
**(जुना विशेष दिवाणी दावा क्र.१९/२०१८)**
**निशाणी क्र.३२ खालील आदेश**

प्रस्तुत अर्जाने वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १ नियम १० प्रमाणे अर्जामध्ये नमुद प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ ते १० यांना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०२. प्रस्तुत अर्जाची नोटीस संभावित प्रतिवादींना पाठविण्यात आली. परंतु संभावित प्रतिवादी क्र.५, ६, ७, ९ व १० यांना नोटीस मिळुनही ते हजर झालेले नाहीत. परिणामी, प्रस्तुतचा अर्ज संभावित प्रतिवादी क्र. ५, ६, ७, ९ व १० यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

०३. संभावित प्रतिवादी क्र.८ ने निशाणी क्र.६७ येथे म्हणणे देऊन तो दाव्यास आवश्यक पक्षकार नसल्याचे कथन करुन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०४. वादीतर्फे वकील सौ. विद्या भाटे व संभावित प्रतिवादी क्र.८ तर्फे वकील श्री. राजेश शेट यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्ज व प्रतिवादी क्र.८ ने दिलेल्या म्हणण्याचे विवेचन करण्यात आले. मुळ दाव्याचे अवलोकन करता वादीने दावा मिळकतीमधील त्याचा हिस्सा सरस–निरस मानाने वाटप होऊन मिळावा, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीसंदर्भात दिनांक २९/०४/२००८ व दिनांक २४/१०/२०११ रोजीचे खरेदीखत बेकायदेशीर असुन ते वादीवर बंधनकारक नाही असा ठराव होऊन मिळावा अशी विनंती केली.

०५. वादीचे कथन की, दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या मुळच्या वडिलार्जित मिळकती असुन प्रतिवादी क्र.१ ने वादी यास मयत दाखवुन ग्रामपंचायत व इतर कार्यालयातुन खोटे मृत्यू प्रमाणपत्राआधारे दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी स्वतःच्या नावाच्या खोटया नोंदी घेतल्या. सदर नोंदी आधारे दावा मिळकत प्रतिवादी क्र.२ ते ४ व संभावित प्रतिवादी क्र.५ ते १० यांना वेगवेगळया खरेदीखताने विक्री केल्या. संभावित प्रतिवादी क्र.५ ते १० यांच्यासोबतचे व्यवहार अलीकडेच वादीला माहिती पडले असता त्यास प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले. वादी हा वेगळया अर्जाने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन संभावित प्रतिवादी क्र.५ ते १० यांच्याविरुध्द दाद मागत आहे. सबब, संभावित प्रतिवादी क्र.५ ते १० हे दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याचा युक्तीवाद केला.

०६. वर नमुद केल्याप्रमाणे संभावित प्रतिवादी क्र. ५, ६, ७, ९ व १० यांच्याविरुध्द अर्ज एकतर्फा चालविण्यात आला. तर संभावित प्रतिवादी क्र.८ ने तो दाव्यास आवश्यक पक्षकार नसल्याचे कथन केले.

०७. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता, तसेच वादीने प्रतिवादी क्र.१ विरुध्द केलेले inpersonation चे आरोप, व सद्यस्थितीत दावा मिळकत संभावित प्रतिवादींच्या मालकी कब्जे वहिवाटीत असल्याची बाब लक्षात घेता संभावित प्रतिवादी हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. संभावित प्रतिवादींना दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ट केल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट त्यांना प्रतिवादी म्हणुन दाव्यात समाविष्ट केल्यास दावा मिळकतीसंदर्भात उद्भवणारे पुढील दावे टाळणे शक्य आहे. सदर बाबी विचारात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद संभावित प्रतिवादी यांना दाव्यात प्रतिवादी क्र.५ ते १० म्हणुन समाविष्ट करण्याची वादीस परवानगी देण्यात येते.

३. आदेश कलम २ प्रमाणे वादीस दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/-

(**पी. एम. उन्हाळे**)

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

महाड

दिनांक ३०/१०/२०२३